भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सहयोगीत

# –: ग्रामिण कृषि मौसम सेवा प्रकल्प :–

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला पत्रक - सिंधुदुर्ग
## कालावधी (दिनांक ०४.०१.२०२० ते ०८.०१.२०२०)

अंक १/२०२० | दिनांक ०३.०१.२०२० | कालावधी ५ दिवस

| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (२८/१२/२०१९ ते ०३/०१/२०२० पर्यंत) | | | | | | | हवामान घटक | | पुढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पूर्वानुमान (वैधता ०४/०१/२०२० ते ०८/०१/२०२० पर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २८/१२ | २९/१२ | ३०/१२ | ३१/१२ | ०१/०१ | ०२/०१ | ०३/०१ | दिनांक | | ०४/०१ | ०५/०१ | ०६/०१ | ०७/०१ | ०८/०१ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मि. मी) | | ० | ० | ० | ० | ० |
| ३५.५ | ३५.५ | ३५.५ | ३४.० | ३३.० | ३३.० | ३३.० | कमाल तापमान (अं. से) | | ३४ | ३४ | ३३ | ३२ | ३२ |
| २२.० | २१.५ | २२.० | १७.५ | १६.० | १७.० | १७.० | किमान तापमान (अं. से) | | २१ | २२ | २२ | २१ | २० |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | सकाळ | मेघाच्छादन (ऑक्टा.) | ० | ० | २ | ५ | ४ |
| निरभ्र | निरभ्र | ढगाळ | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | दुपार | | | | | | |
| ८८ | ९१ | ९३ | ९२ | ८३ | ९१ | ८७ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | | ८६ | ७६ | ७६ | ८६ | ८२ |
| ४७ | ४२ | ४६ | ४५ | ४५ | ४५ | | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | | ४९ | ३६ | ३८ | ४४ | ४५ |
| १.७ | १.१ | १.९ | १.० | १.३ | १.१ | १.३ | वा-याचा वेग (कि.मी/तास) | | ००५ | ००५ | ००८ | ००६ | ००६ |
| स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | सकाळ | वा-याची दिशा | पूर्वे कडून | ईशान्ये कडून | पूर्वे कडून | पूर्वे कडून | ईशान्ये कडून |
| ईशान्य | आग्नेय | दक्षिण | दक्षिण | पश्चिम | पश्चिम | | दुपार | | | | | | |

| मागील वर्षातील (२०१९) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०२० पासुनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०२० पासुनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ४५९१.० | ०.० | ०.० | ०.० |

**पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती:** येत्या ५ दिवसात जिल्ह्यामध्ये हवामान कोरडे व अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे.

## हवामान पुर्वानुमान कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| वायंगणी भात | रब्बी पेरणी | नुकतीच लागवड केलेल्या भात शेतामध्ये सुरुवातीचे ८ ते १० दिवस पाण्याची पातळी २ ते ३ से. मी. ठेवावी. त्यानंतर ५ से. मी. पर्यंत वाढवावी. |
| कुळीथ व चवळी | रोप ते शाखिय वाढ | चवळी, वाल, कुळीथ इ. पीकांवर मावा व पाने पोखरणारी अळी या किडींचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने नियंत्रणासाठी १५ मि.ली. डायमिथोएट प्रती १० लीटर पाण्यात मिसळुन फवारावे. |
| भुईमुग, सुर्यफुल व मोहोरी | पेरणी | भुईमुगाची पेरणी केल्यानंतर ३ दिवसांनी हलके पाणी द्यावे व त्यानंतर १० ते १२ दिवसाच्या अंतराने पिकाला पाणी द्यावे. तसेच सुर्यफुल व मोहोरी पिकाला वेळेवर पाणी द्यावे. |
| आंबा | पालवी | यावर्षी लांबलेल्या मान्सुनोत्तर पाऊसामुळे आंबा फळ पिकास आवश्यक असणारा पाण्याचा ताण न मिळाल्यामुळे आंब्याची मोहोर अवस्था लांबणीवर पडली आहे. तसेच नोव्हेंबर महिन्यातील चक्रिय वादळामुळे व सततच्या ढगाळ वातावरणामुळे किमान तापमानात घट झाली नाही तरी मोहोर अवस्था येण्यासाठी आवश्याक असणारे तापमान व हवामान (तापमानातील घट, वाढलेले स्वच्छ सुर्यप्रकाशाचे तास व कमाल व किमान तापमानातील तफावत आंबा पिकास ताण बसण्यास पोषक आहे.) सद्यपरस्थितीमध्ये पोषक असुन आंब्यास लवकरच मोहोर येण्याची शक्यता आहे.<br>पालवीवर मोठ्या प्रमाणावर तुड्तुड्यांचा प्रादुर्भाव आढळुन आल्यास तुड्तुडे, फुलकीडे व खवले किडीच्या नियंत्रणासाठी डेल्टामेथ्रिन २.८% प्रवाही (०.९ मिली प्रती १ लीटर पाणी) किंवा थायोमेथॉक्झोन २५% (WDG) (०.१ ग्रम प्रती लीटर पाणी) या किटकनाशकांची फवारणी करावी. आंबा पिकावर करपा व भुरी रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असुन प्रादुर्भाव आढळुन आल्यास नियंत्रणासाठी थायोफिनेट मिथिल व कार्बेन्डाझीम १% १ ग्रम प्रती १ लिटर पाण्यातुन फवारावे. |
| काजु | मोहोर | सदरील वातावरण काजु ढेकण्या किडीच्या प्रादुर्भावासाठी अतिशय पोषक असल्याचे दिसुन आले आहे. पुढील वातावरण काजु ढेकण्या किडीसाठी पोषक असुन शेतक-यांच्या बागेमध्ये मोहोर आहे त्यांना प्रोफेनोफॉस ५० टक्के प्रवाही १० मिली प्रति १० लिटर पाण्यातुन व ज्या शेतक-यांच्या बागेमध्ये फलधारणा झालेली असेल त्यांनी लॅम्ब्डासायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मिली प्रति १० लिटर पाण्यातुन काजुवरील ढेकण्या किडीच्या नियंत्रणासाठी फवारणी करावी.<br>काजुच्या झाडाला रोठा किड लागली असल्यास पाने पिवळी पडतात व खोडामधुन छिद्राद्वारे भुसा बाहेर पड्लेला दिसतो. काजुवर खोड्किडा (रोठा) या किडिचा प्रादुर्भाव आढ्ळुन आल्यास १५ मि.मी. पटाशिच्या सहाय्याने प्रादुर्भित साल काढून झाडातील रोठ्याला बाहेर काढून मारुन टाकावे व तो भाग २०% प्रवाही क्लोरोपायरीफॉस ५० मी. लि. १० लिटर पाण्यामध्ये मिसळून चांगला भिजवावा.<br>काजुवरील बोंड व बी पोखरणा-या अळींच्या नियंत्रणासाठी डायक्लोरोव्हॉस ७६% प्रवाही १० मिलि प्रती १० लिटर पाण्यातुन फवारावे. |
| मिरची | फुलोरा | मिरचीवर बोकड्या किंवा चुरडा मुरडा रोगाचा प्रादुर्भाव आढळुन आल्यास रोग नियंत्रणासाठी व रोगकारक किडींच्या उदा. फुलकिडे व पाढरी माशींच्या नियंत्रणासाठी लागवडीनंतर १५ दिवसांनी फोरेट १० कि./हे. द्यावे तसेच डायमिथोएट ३०% प्रवाही १ मिली + गंधक २ ग्रम किंवा मॅन्कोझेब २ ग्रम प्रती लिटर पाण्यात मिसळुन पुर्नलागवडीनंतर १० ते १५ दिवसांच्या अंतराने फवारावे. |
| दुभती जनावरे, शेळ्या, कुक्कुट्पालन | | रात्रीच्या वेळी किमान तापमानात घट होत असल्याने जनावरांचे थंडीपासुन योग्य ते संरक्षण करण्यासाठी रात्रीच्या वेळी जनावरांना गोणपाटाचे पांघरुन घालावे तसेच रात्रीच्या वेळी कोंबड्याचे थंड वा-यापासुन संरक्षण करण्यासाठी शेडला बाहेरुन पडदे लावावेत. तसेच पिल्लांना पुरेशी ऊष्णता देण्यासाठी विद्युत दिव्यांची व्यवस्था करावी. |

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशीक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील "ग्रामीण कृषि मौसम सेवा" योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.

डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर
सहयोगी अधिष्ठाता
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर
नोडल ऑफिसर
(ग्रामिण कृषि मौसम सेवा)
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
(०२३६२-२४४२३१)

डॉ. यशवंत चं. मुठाळ
तांत्रिक अधिकारी
ग्रामिण कृषि मौसम सेवा
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
(०२३६२-२४४२३१)